# साहित्य गाभाऱ्यातील

## प्रतिमा चिंतन



संपादक : डॉ. राजेश चवरे

Scanned with OKEN Scanner

ईगल लीप प्रकाशन, पुणे

# साहित्य गाभाऱ्यातील प्रतिमा चिंतन

संपादक : डॉ. राजेश चवरे

प्रकाशन आणि मुद्रक

संदेश दादाराव पहुळकर,
ईगल प्रिंटर्स अँड पब्लिशर प्रा.लि. पुणे
ऑफिस नंबर २८, विशाल रेसिडेन्सी, कासरवाडी पुणे
संपर्क : ८६०००७१६३४

प्रथमावृत्ती : ०५ जानेवारी २०२३

अक्षर मांडणी :

शिव पौळ, ईगल इन्फोमेडीया, पुणे

ISBN : 978-81-958425-7-5
YEAR : 2023

ISBN : 978-81-958425-7-5
9 788195 842575

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पूननिर्मिती अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणूकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. यासाठी सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शीर्षक | लेखकाचे नाव | पा.नं |
|---|---|---|---|
| १. | स्नेहांकिता | प्रा.डॉ. पुरुषोत्तम माळोदे | ०१ |
| २. | निसर्ग संवादी कवी – कै. उ. रा. गिरी | प्रा. डॉ. महेंद्र गिरी | १३ |
| ३. | पुलंची व्यक्तिचित्रे : जीवननिष्ठांची मांदियाळी | प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे | २० |
| ४. | मराठीतील वाङ्मयीन चळवळी | प्रा. डॉ. पी. विठ्ठल | ३२ |
| ५. | स्त्री प्रतिमा : एक आकलन | प्रा. डॉ. गजानन हेरोळे | ४७ |
| ६. | आचार्य प्रल्हाद केशव अत्रे पत्रकाराची सामाजिक बांधीलकी | प्रा. डॉ. महेंद्र गिरी | ५३ |
| ७. | ना. धों. महानोर : लोकमानसाला प्रभावित करणारे कवी / पी. विठ्ठल | प्रा. डॉ. पी. विठ्ठल | ६३ |
| ८. | स्वातंत्र्योत्तर वैदर्भीय मराठी कथा | प्रा. डॉ. पद्मरेखा धनकर | ७१ |
| ९. | बाबाराव मुसळे यांचा साहित्यिक प्रवास | प्रा. डॉ. लीला मोरे | ८७ |
| १०. | समकालीनता, नवीनता आणि अभिजातता | प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे | १०१ |


Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-958425-7-5 YEAR : 2023

# ०२ निसर्ग संवादी कवी - कै. उ. रा. गिरी

**प्रा. डॉ. महेंद्र गिरी**
(सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग)
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती
मो. नं. ९४२१७३६६६२, ई-मेल- mkgiri7867@gmail.com

कै. उध्दव रामगीर गिरी, लाखपुरी सारख्या ग्रामीण भागात वास्तव्य करणारा, प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन काव्यनिर्मिती मध्ये दंग राहणारा आत्ममग्न कवी, त्यांच्या कवितेचे विषय जरी निसर्ग वर्णनपर व प्रेमाविष्कार साकार करणारे असले तरी समाजाच्या बदलल्या वास्तवतेचे व मुल्यव्यवस्थेचे चित्रणही त्यांच्या कवितेत दिसते. १९५१ ते १९८२ या बत्तीस वर्षाच्या कालखंडातील उ. रा. गिरी यांची कविता भावकवितेच्या जातीच्या असून त्यातील निसर्ग संवादी कविता सौंदर्यसक्त मनाने निसर्गातील अनुभव लयपूर्ण व लालीत्यपूर्ण शब्दकळेने बांधले गेले आहे. भावकविता सदृश स्वरुपाची कवितेची जडणघडण, निसर्ग घटीतांच्या प्रतिमा, सांगितिक लयीमधून व्यक्त होतांना दिसते. निसर्गातील विविध विषयांची अभिव्यक्ती आत्मनिष्ठेच्या कोंदणासहीत पारंपारिक सौंदर्यवादी दृष्टीकोनानी बांधली गेलेली आहे. निसर्ग, प्रेम, संगीत, अंतर्मुखतः यात त्यांची कविता मनापासून रमते. अर्थवादी प्रतिके वापरुन काव्यगत भावना फुलविण्यात त्यांची प्रतिभा कुशल आहे. निसर्गातील समरुप अशी मानवी भावभावनांची अभिव्यक्ती हे उ. रा. गिरींच्या कवितेतील सशक्त माध्यम आहे. म्हणूनच उ. रा. गिरींच्या कवितेचे स्थायीरुप निसर्ग संवादी भावकवितेचे- सौंदर्यवादी भावकवितेचे आहे. म्हणून त्यांची कविता संपन्न व्यक्तिमत्वाची व जिवंतमनाची कविता आहे. कवी उ. रा. गिरींची कविता शब्दसुरांचे आणि निसर्गाचे चिंतन करणारी कविता आहे. आत्ममग्न कवी विचारांचे कल्पनेचे प्रतिबिंब रेखटतो आणि तशी शब्दचित्रे आकाराला आणतो. त्यातच कवीचे वेगळेपण जाणवते. सभोवतालचे व्यवहारी विचार डोळ्यात भरत आणि स्वजाणिवाचे ओझे सावरत उ. रा. गिरीची कविता रस, रंग, रुप, शब्द, लय या पंचतत्वासोबत सतत फुलत राहिली. त्याची गुणवत्ता कमी झालेली नाही. उ. रा. गिरी दुःख विसरुन आनंदयानी होतात. तेव्हा तिथेच त्याची कविता फुलते, रसरसते वाचकांच्या मनाचा वेध घेते, हेच भावनिक काव्यरुप जपणारे आधुनिक मराठी कवितेतील सौंदर्यवादी कवी आहेत.

Scanned with OKEN Scanner

कै. उध्दवगीर रामगीर गिरी हे आधुनिक मराठी कवी परंपरेतील प्रतिभावंत कवी आहेत. अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूर तालुक्यातील लाखपूरी सारख्या छोट्याशा गावात गरीब गोसावी कुटुंबात जन्माला आलेले ते प्रतिभावंत कलाप्रेमी, साहित्यिक, प्राथमिक शिक्षकाची नोकरी प्रामाणिकपणे करणारे संवेदनशील मनाचे कर्तव्यदक्ष शिक्षक.

अल्प आयुष्य त्यांच्या वाट्याला आले, तरी मराठी साहित्याच्या काव्यप्रांतात स्वकतृत्वाने एक वेगळीक साध्य करणारे घरच्या हालाखीच्या परस्थितीचे अनुभव घेवून सभोवतालच्या निसर्गाचे उत्कट चित्र शब्दातून रेखाटणारे त्यांचे कवीमन परिपक्व चिंतनशील व समाजमनस्क असे आहे.

त्यांची कविता निसर्ग संवादी असून निसर्ग प्रतिमा व समाजजीवनातील प्रतिमांच्या सौंदर्यवादी रुपबंधाची लयपूर्ण नादमय, माधुर्य प्रधान असून सौंदर्य दर्शनाच्या अंगाने फुलत गेलेली आहे. निसर्ग, प्रेम, संगीत यात त्यांची कविता रममाण झालेली आहे. निसर्गातील विविध रंगी छटा त्यांची लयबध्द शब्द योजना आणि मृदूमधूर भावलेखन यातून त्यांची कविता नादमधूर व लयबध्द, संगीत प्रधान बनली आहे. तिला स्वतःचा सूर, स्वर, ताल, लय आणि नाद आहे. हे सर्व निसर्गाचे संवादी अविष्कार घेवून त्यांची कविता वाचकांच्या, श्रोत्यांच्या मनाचा वेध घेते. सांगितिक प्रतिमा हे त्यांच्या कवितेचे अनन्य साधारण वैशिष्टे आहे.

कवितेमध्ये कवीचा अंतर्गत भाव, काव्यानुभव व्यक्त होत असतो. या भावाना एक लय असते. कवीच्या अनुभवाची भावलय शब्दांना नवे रुप देते. शक्तीवान बनविते. कवितेची शब्दरुपे भावलयीत पर्यवसित होतात तेव्हा ती रचना कविता बनते. कै. उ. रा. गिरीच्या कवितेत ही मानवी अनुभवाची शब्दरुपे लयदारपणे मन वेधून घेणारी आहे. त्यामुळे व्यवहार भाषेपासून उ. रा. गिरीच्या कवितेची भाषा वेगळी बनते ते शब्द भावलय अविष्कृत करु लागतात. प्रेम आणि निसर्ग यांची अभिव्यक्ती ते साध्य करतात.

कै. उ. रा. गिरी यांच्या कवितेतील प्रतिमा भावाशय समृध्द करणाऱ्या आहेत. त्यामुळे अनेक काव्य समिक्षक निसर्ग संवादी म्हणूनही उ. रा. गिरींना संबोधतात. ते निसर्गाशी बोलतात. त्यांच्या शब्दामध्ये भावलय साकार होते, म्हणून आपल्या 'अशाच एका सोनसकाळी' या कवितेत कवी म्हणतात–

स्वप्नाळू डोळ्यातील तुझिया
धुके गुलाबी प्यालो होतो.
– (पृष्ठ क्र. १३)

हा प्रणय भावनेतला सूचितार्थ आशयाला प्रतिकात्मक पातळीवर नेला आहे.





या प्रतिकात्म पातळीमुळेच कवितेच्या एकात्म संघटीत अशा काव्यार्थाची प्रतिती येथे येते. त्यामुळेच कवितेचे निसर्ग संवादी मुल्य ठरले गेले आहे. मानवी देहसौंदर्य आकर्षण केवळ बाह्य न राहता आंतर सौंदर्याची ओढही कवी मनाला लागलेली आहे. पंच संवेदनाची स्पर्श जाणीव निसर्ग आणि प्रेम यांच्यातील अद्वैत जाणवून देणारी दृष्टी आहे. निसर्ग सौंदर्याचे रेखाटन करतांना निसर्गाचे मंत्रमुग्ध करणारे विश्व आणि कवीची संवेदनशिलता भाववृत्तीचे प्रतिबिंब शोधु लागते व ती कविता निसर्गाचाच एक भाग बनते. हि संवेदनाची उधळण फक्त निसर्गचित्रा पुरती नाही तर प्रेयसीच्या रुपाला कवी निसर्ग लावण्याची आठवण करुन देतात.

तू भिजलेले नितळ रानफूल
ओल्या पंखाची तू फडफड
अवचित झडलेली श्रावणसर
तू थेबांची अधीर तडतड
(कोरडाच मी ओठ परंतू, पृष्ठ क्र. ८)

विविध निसर्गरुपापैकी पावसाचे आणि पहाटेचे विशेष आकर्षण कवी उ. रा. गिरीच्या शब्दामध्ये दिसते. त्यांच्या आत्मिक संवेदनेला पाउस आणि पहाट हे दोनही विशेष जाणवतात. त्यातून त्याची भावपरता लक्षवेधी ठरते. अशी अनेक रुपे उ. रा. गिरींच्या कवितेमध्ये ठिकठिकाणी दिसते.

पूर्वेस हासलेला
गालात शुक्रतारा
पाउल वाजलेले
प्राचीवरी उषेचे
( मी एकटा निघालो–काव्यसंग्रह) (कर सैल तू गळ्यातील, पृ.क्र. ९)
किंवा
हलकेच निष्पाप पापण्यांनी
निद्रेचे आवरण सावरुन
उमलू लागलेले
तुझे डोळे – एक उषः सुक्त दवस्नात निळे !
(मी एकटाच निघालो–काव्यसंग्रह)
(डोळ्यातल्या कविता, पृ. क्र. ६७)

भावपरता हि उ. रा. गिरीच्या कवितेची प्रेरणा आहे. गिरींच्या काव्यातील प्रतिमासृष्टी ही सौंदर्यवादी वृत्तीशी नाते सांगते. गिरीच्या काव्यातील निसर्ग प्रतिमा या अशा उत्कट संवेदनांनी अनुभवाची चित्रे फुलवित येतात.



Scanned with OKEN Scanner

गिरींच्या कवितेतील पाउस प्रतिमा, पहाटेची चित्रे त्या प्रतिमांमधून चित्रित झालेला तरल व प्रसरणशील भाव त्या प्रमाणेच पावसाची वेगवेगळी रुपे हसरी, नाचरी, संगीतमय अशी त्यांनी कवित रंगविली आहेत ती अशी–

थेंब जांभळे झरता झरझर
उष्ण धूळीचे थरथरले थर
शतधारांनी कोसळली सर कणाकणांतील वणव्यांवर
( आलीस पहिल्या पावसात, पृ. क्र. १९)
किंवा
लाडक्या श्रावणसरी
पावसाची पैंजणे जणु वाजती वाऱ्यावर – (लाडक्या श्रावणसरी, पृ. क्र. ४१)
किंवा गात्रा गात्रात चढते आहे
सावनसरीचे रिमझिम जहाल
– (श्रावणातल्या कविता, पृ. क्र. ६५ )

त्यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी विविध प्रतिमांनी भरलेली आहे. कवितेतील निसर्ग प्रतिमा, सांगितिक प्रतिमा, या आगळ्या वेगळ्या आहेत. त्यांच्या निसर्ग प्रतिमेमधील रंगवेडेपणा वाचकाच्या मनात प्राजक्ता सारखे टपटप पडणारे आणि पूर्वेच्या केशरी रंगाच्या चाहूलीचे वाटते. हे रंगाचे विश्व संवेदनाची आशय घनता आधिक टोकदार करणारी आहे.

सौंदर्यवादी कवी हा पार्थिव सौंदर्याचा पूजक असतो, पण या बाह्य सुंदरतेच्या दर्शनातून अपार्थिवाच्या सौंदर्यदर्शनाची वाट फुटत असते. मानवी जीवनातील व्यक्तिनिष्ठ अनुभवामधून विश्वात्म अनुभवाची अनुभूती घेतांना आंतरीक सौंदर्याचा आत्ममग्न अनुभव कलावंत घेवू लागतो. देहसौंदर्याचा इंद्रिय संवेदनाचा गौरव करते.

निसर्ग हा अनेक संवेदनांनी बांधलेला असतो. त्याच सर्व संवेदना निसर्गातील सौदर्यांच्या अलंकारानी नटून गिरींची कविता भारावलेली आहे, निसर्गाबद्दल अतीव कृतज्ञतेने भारलेली आहे. निसर्ग माणसाला जगण्याची उर्मी देते, त्यात चित्तत्व भरलेले आहे. अशा सर्व जाणीवामुळे कवीला सुध्दा निसर्ग प्रेमामुळेच जगावेसे वाटले. त्यावर असलेल्या अपार विश्वासाने जीवनाच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन दुर्दम्य आशेने जगात आले हा कवीचा अनुभव अंतर्मुख करणारा आहे. निसर्ग आणि मानवी जीवन यांचे नाते त्यांचा साक्षात्कार त्यांच्या अनेक शब्दाशब्दात जाणवतो म्हणूनच कवी म्हणतात,

नसते तृणपुष्पांच्या नेत्री
अश्रु दवाचा माझ्यासाठी



या जखमेस्तव शीतल फुंकर
जरी नसती वाऱ्याच्या ओठी
क्षितीजावर
तुझा जर नसता
अदभूत निळसर भास दाटला
असीम या वेदनेपरी तव
करुणामय कर कधीच फिरला
तर मग माझे झाले असते..
काय अदम्य दुनियेत खरोखर ?
फुटती का रे जीवन नौका

माणूस नावाच्या खडकावर? पण आहे चंद्राशी नाते
या रजनीशी माझा परिचय
म्हणून इथल्या काळोखावर
सदाच आलो मी मिळविज जय !

ही कविता म्हणजे कवीच्या जीवन जगण्याची प्रेरणा देणारी बलस्थान आहे. आपल्या वास्तव जीवनातले कटूतेचे, परिस्थितीचे क्षण पाहता पाहता आशावादी बनून त्यावर जय मिळवित आलो. अशी भव्य दृष्टी व समग्रता त्याच्या शब्दामधून व्यक्त केले. कवी स्वप्नात जगत नाही वास्तव सत्य सृष्टीतील चिरंतन रहस्य शोधण्याचा त्यांचा प्रयत्न वास्तवातील जीवनसृष्टीत साकारतांना दिसतात. म्हणून कवी म्हणतात की, झोपेत हासणाऱ्या

चुंबून राहुलाशी
माझ्या यशोधरेला
सोडून मी निघालो
– ( मी एकटा निघालो, पृष्ठ क्र. १)

आपल्या नशिबाला आलेला भोग स्विकारुन सौदर्यध्यास घेवून हा कवी बेहोष प्रवास करतो. कलावंताच्या वाट्याला आलेले एकाकीपण, प्रसिध्दीचा हव्यास टाकून उ. रा. गिरी आपल्या अनुभवाशी, शब्दांशी प्रमाणिक राहतात. व्यवहारी कोलाहाला पासून, गदीत त्यांची कविता कधीच हरविली नाही. ही कविता जीवनाच्या समग्र आणि सर्वव्यापी आकलनापासून दुर गेलेली नाही. एकलेपणाचा पियानो छेडीत जीवनाचं दुखरं गाणं सुसाह्य करु पाहणारे कवी उ. रा. गिरी म्हणतात,

व्याकूळ यामिनीला कुठली पहाट माझ्या

आता उषा उद्याची विसरुनी जा दिशांनो.
या एकलेपणाचा छेडीत पियानो
ओठास भैरवीच्या दंशून जा स्वरांनो.
– (उ. रा. गिरी, पृष्ठ क्र. ७२)

जीवन प्रवाहाला एक निसर्गदत्त गती असते. या गतीनेच माणूस संथ आणि समन्वय साधत जगत असतो. कै. उ. रा. गिरीच्या कवितेचे स्वरुपही जीवन प्रवाहाला गती देते. समन्वय साधते त्यामुळे उ. रा. गिरीच्या कवितेचे स्वरुपही विशुध्द स्वरुपाचे आहे. वस्तू आणि भाव, शब्द आणि भाव यांचा एकात्म प्रत्यय त्यांची कविता वाचतांना रसिकाला येतो.

अशा प्रकारे आपण उ. रा. गिरींच्या कवितेतू खालील भोध घेवु शकतो.

१) भावपरता ही कै. उ. रा. गिरींच्या कवितेची प्रेरणा आहे.
२) स्त्री मनाच्या विविध रुपाची अभिव्यक्ती हे त्यांच्या कवितेचे बलस्थान आहे.
३) नादमय भाषा, उत्कट निसर्ग प्रेम आणि सहज आविर्भाव हे त्यांच्या निसर्ग कवितेचे विशेष आहे.
४) जीवनाचे स्वरुप समजून घेणाऱ्या मानवी मनाची संवेदना
५) विविधापूर्ण अनुभव विश्व टोकदार अभिव्यक्ती आणि सभोवतालचे चिंतन करणारी कविता.
६) नादमयता आणि चित्रात्मकता, संगीतानुकल शब्दरचना
७) मनाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे निव्वळ रंजन करणे हा कलेचा हेतू आहे. असे मानणारी कै. उ. रा. गिरीं ची कविता नाही. अंतर्मनाच्या खोल गाभाऱ्यात जावून मनाला अधिक संवेदनशील करणारी त्याची कविता आहे.
८) तारुण्यसुलभ प्रेमभावना आणि प्रणयभावना यांचा अविष्कार मृदु मुलायम शब्दातून प्रकट करतात.
९) यंत्र संस्कृती मधला रुक्षपणा, शुष्कपणा व्यवित करते तेव्हा कवी मनाला साद घालणारी शब्दांची मृदुलता मानवी संवेदनेला हिरवेपण देणारी कै. उ. रा. गिरीं यांची कविता आहे.





### संदर्भसूची :


मी एकटा निघालो – अंशुल पब्लिकेशन, नागपूर, द्वितायावृत्ती १९९० प्रकाशिका – शशिकला मोहाडीकर

वैदर्भीरीती (समिक्षा) – लेखक डॉ. सुभाष सावरकर, प्रकाशक– मराठी जनसाहित्य परिषद अमरावती, (कै. उ. रा. गिरीं – पृष्ठ क्र. १०९)

मी एकटा निघालो (कै. उ. रा. गिरीं) सर्वागिण विवेचन व अभ्यास, वैभव प्रकाशन, महाल नागपूर, –पृष्ठ क्र. ४


* * *



Scanned with OKEN Scanner



'साहित्य गाभाऱ्यातील प्रतिमा चिंतन' या संपादकीय ग्रंथातून विविध समीक्षकांनी अनेक रचनांमधून निर्माण झालेल्या प्रतिमेचे अभ्यासपूर्ण विश्लेषण मांडलेले आहे. मराठी साहित्यातील अनेक प्रकार प्रतिमा आणि प्रतीकातून आकारास आलेले आपणास दिसतात. लेखकाच्या कल्पनाशक्तीतून प्रतिमा मांडली जाते आणि वाचक व्यक्तीपरत्वे आपल्या दृष्टिकोनातून आणि संवेदनशक्तीतून अनेक प्रतिमा निर्माण करतो. प्रतिबिंब या शब्दाला अनुसरून प्रतिमा आपण स्वीकारीत असतो.

कलाकृतीतील एखाद्या पात्राचे आपल्या मनात जे प्रतिबिंब आकारास येत असते, ते प्रतिबिंब वेगवेगळ्या प्रतिमा लेवून वाचक आपल्या मनात साठवितो. समाजात वावरताना देखील आपण अशाच प्रतिमा सिद्ध करीत असतो. ही सिद्धता म्हणजे प्रतिमेची शोधयात्रा देखील असते. प्रतिमानिर्मिती ही माणसाला निसर्गाकडून मिळालेली प्रतिभाशक्ती आहे. तिचा सतत वापर करून आपण आपल्या मनात अनेक प्रतिमा साठवीत असतो.

प्रा.डॉ.राजेश चवरे यांनी आपल्या संपादनातून या संवेदनशील विषयाला साकारण्याचा मनोज्ञ प्रयत्न केला आहे. 'प्रबोध संजीवक जोतीराव' या ग्रंथातून जोतीरावांची भूमिका आणि प्रतिमा साकारण्याचे कौशल्य यापूर्वी डॉ.राजेश चवरे यांनी साकारले आहे. त्यांनी आजपर्यंत लिहिलेल्या अनेक लेखांमधून देखील त्याची आपणास जाणीव होते. येथे मांडलेल्या विविध ठळक प्रतिमांचा अभ्यास म्हणजे एक प्रकारचा प्रतिमोत्सवच आहे. त्यांच्या या संपादकीय आविष्कृतीसह भविष्यातील प्रतिमा निर्मितीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

- डॉ.साहेब खंदारे

ईगल लीप प्रिंटर आणि पब्लिशर प्रा. लि., पुणे
SNO ५७/४/५ बालाजी कॉलनी, हनुमान मंदिर,
बिजाली नगरशिवनगर, चिंचवड, पुणे, महा- ४११०३३.
संपर्क : ८६०००७१६३४
ई-मेल : eagleleap.pp@gmail.com

9 788195 842599
ISBN : 978-81-958425-0-6

Scanned with OKEN Scanner